# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-**
**{ शिक्षण विभाग }**

सद्यःस्थितीत स्पर्धेच्या या युगात इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणे ही काळाची गरज बनलेली आहे. बदलत्या काळाची पावले ओळखून मध्यम वर्गीय किंवा आर्थिक कमकुवत गटातील पालकही आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत टाकत आहेत. याचा परिणाम म्हणून दिवसेंदिवस नागपूर महानगरपालिकेच्या मराठी/हिंदी/उर्दू प्राथमिक शाळांची पटसंख्या घसरत आहे. मागील 10 ते 15 वर्षाच्या काळात महानगरपालिकेच्या अंदाजे 100 शाळा बंद झालेल्या असून या पैकी 35 ते 40 शाळा इमारती रिकाम्या स्थितीत आहेत. मनपाच्या शाळांमध्ये शिक्षण घेणा-या पाल्यांचा आर्थिक स्तर दुर्बल/कमकुवत असल्यामुळे अश्या विद्यार्थ्यांना सुध्दा मध्यम/उच्च आर्थिक स्तर असलेल्या विद्यार्थ्यांप्रमाणे इंग्रजी माध्यमातुन शिक्षण घेण्याची संधी मिळावी व त्यांना हे शिक्षण मोफत मिळावे यास्तव शैक्षणिक सत्र 2020-21 पासुन 6 विधानसभा मतदार क्षेत्र निहाय प्रत्येकी 1 याप्रमाणे खालील 6 संपुर्ण इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरू करण्यात आल्या.

अ) पुर्व नागपूर — बाबुळबन मनपा इंग्रजी प्रा.शाळा
ब) पश्चिम नागपूर — रामनगर मनपा इंग्रजी प्रा.शाळा
क) मध्य नागपूर — स्व.गोपालरावजी मोटघरे मनपा इंग्रजी प्रा.शाळा
ड) उत्तर नागपूर — राणी दुर्गावती नगर मनपा इंग्रजी प्रा.शाळा
इ) दक्षिण नागपूर — म्हाळगीनगर मनपा इंग्रजी प्रा.शाळा
ई) दक्षिण पश्चिम नागपूर — स्व.बाबुरावजी बोबडे मनपा इंग्रजी प्रा.शाळा

प्रस्तावित —

अ) पश्चिम नागपूर - रा.ब.गो.गो.मनपा इंग्रजी प्रा.शाळा (शै.सत्र 2025-26 पासुन सुरू करण्यास मान्यता)
ब) उत्तर नागपूर — कुंदनलाल गुप्ता इंग्रजी प्रा.शाळा (शै.सत्र 2026-27 पासुन सुरू करण्यास मान्यता)

उपरोक्त सर्व शाळा या बंद किंवा अत्यंत कमी पटसंख्या असलेल्या होत्या.या सर्व ठिकाणी EOI प्रक्रिया राबवुन The Aakansha Foundation या स्वयंसेवी संस्थेची निवड करून शैक्षणिक सत्र 2021 — 22 मध्ये KG-1 व KG-2 हे वर्ग सुरू करण्यात आले. याबाबतचा सामंजस्य करार (MOU) दि. 12/06/2021 रोजी करण्यात आला.

पालकांची मनपा क्षेत्रात इतरही ठिकाणी या शाळा उघडण्याबाबत विनंती/मागणी मा. आयुक्त यांना प्राप्त झालेली असुन या शाळांमधील गुणवत्तापुर्ण शिक्षण बघता मा.आयुक्त यांनी देखिल महानगरपालिकेच्या ज्या शाळा इमारती बंद अवस्थेत/कमी पटसंख्या आहे, जेथे इयत्ता KG-1 ते 10 वी पर्यंत शाळा चालवायची असल्यास वर्गखोल्या उपलब्ध आहेत/बांधण्याची शक्यता आहे, क्रिडांगण उपलब्ध आहे व जेथे आसपास आर्थिक दुर्बल घटक/वंचित घटक वास्तव्यास असतील अश्या जागांचा शोध घेवुन येथे शाळा उघडणे शक्य आहे काय याबाबत अहवाल सादर करण्याचे निर्देशित करून स्वयंसेवी संस्थेच्या सहाय्याने नविन शाळा उघडण्याबाबत सभा घेण्यात आली. सद्यस्थितीत सुरू असलेल्या 6 शाळांकरीता राबविण्यात आलेल्या प्रक्रियेचाच व सर्व बाबींचा अवलंब करून आकांक्षा फाऊंडेशन सह/व्यतिरीक्त इतरही संस्था ज्या अशा प्रकारचे कार्य करीत असतील त्यांना आमंत्रित करन निविदा प्रक्रिया करावी. यास्तव खालील प्रमाणे नियोजित स्थळ प्रस्तावित करण्यात येत आहे.

**अ)शाळेचे ठिकाण/स्थळ**

1)उत्तर नागपूर — नारा मराठी प्रा.शाळा (महानगरपालिकेची बंद ईमारत असुन येथे नारा वस्ती, इंदोरा येथील विद्यार्थी प्राप्त होवु शकतील)

2)पुर्व नागपूर - बस्तरवारी मनपा माध्य.शाळा (मनपाची माध्यमिक शाळा असुन सद्यस्थितीत पटसंख्या 20 इतकी आहे. इंग्रजी शाळेकरीता दहीबाजार, बस्तरवारी, लालगंज, तांडापेठ, नाईक तलाव या परीसरातुन विद्यार्थी प्राप्त होवु शकतील.

3)मध्य नागपूर — महात्मा फुले मनपा हिंदी प्रा.शाळा (मनपाची बंद शाळा असुन रात्रीच्या सत्रात नाईट कॉलेज भरते. **G+1** इमारत असुन 14 वर्गखोल्या आहेत. कॉटन मार्केट परीसर, गंजीपेठ, गुजरवाडी या परीसरातुन विद्यार्थी प्राप्त होवु शकतील)

4) पश्चिम नागपूर — दाभा मनपा मराठी प्रा.शाळा (मनपाची शाळा असुन पटावर विद्यार्थी 12 आहेत प्रत्यक्षात नियमितपणे 4 विद्यार्थी हजर असतात. **G+**2 इमारत असुन 6 वर्गखोल्या आहे. तसेच बांधकामास जागा उपलब्ध आहे. दाभा, लावा, वाडी, हजारीपहाड, जागृती कॉलनी, सुरेंद्रगढ या परीसरातील विद्यार्थी प्राप्त होवु शकेल.

5)दक्षिण — पश्चिम नागपूर — अ) धंतोली मनपा प्रा.शाळा (मनपाची बंद शाळा ईमारत असुन जुनी इमारत आहे. सायंकाळच्या सत्रात रात्रशाळा चालते. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असुन तकीया, रामबाग, छोटी धंतोली, बर्डी या परीसरातील विद्यार्थी प्राप्त होवु शकतील.

ब) अजनी पुर्व समर्थ नगर मनपा शाळा, चुना भटटी नागपूर (मनपाची बंद शाळा असुन ही ईमारत जुनी आहे) ही शाळा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी स्थित असुन येथेचुना भटटी परीसरातील विद्यार्थी प्राप्त होवु शकतील.

6) दक्षिण नागपूर — यशवंतराव चव्हान मनपा शाळा (शाळेकरीता इमारत बांधण्यात आली परंतु प्रत्यक्षात शाळा सुरू झाली नाही. येथे खाजगी वाचनालय भरत असुन खालचा मजला पुर्णता रिकामा आहे. **G+1** इमारत असुन 9 वर्गखोल्या आहे. वरच्या माळयावर बांधकाम करता येवु शकेल. सोमवारी क्वॉटर्स, चंद्रमणी नगर, सक्करदरा, मेडीकल, हावरापेठ, बजरंग नगर, विश्वकर्मा नगर या परीसरातील विद्यार्थी प्राप्त होवु शकतील.

खालील प्रमाणे अनुमानित खर्च 7 शाळा सुरु याकरिता प्रथम वर्षी लागणार आहे.

| अ. क्र | विवरण | प्रति शाळा अपेक्षित वार्षिक खर्च | एकुण खर्च |
|---|---|---|---|
| 1 | पायाभूत सुविधा | 10 लक्ष | 70 लक्ष |
| 2 | शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवरील वेतन खर्च | | 3 कोटी |
| 3 | पाठयपुस्तके | | 4 लक्ष |
| 4 | गणवेश | | 4 लक्ष |
| 5 | पोषण आहार | 1 लक्ष | 7 लक्ष |
| 6 | परिवहन व्यवस्था | 2 लक्ष | 12 लक्ष |
| 7 | खेळणी व्यवस्था | 2 लक्ष | 14 लक्ष |
| 8 | डिजीटल वर्गखोली | 2.5 लक्ष | 17.5 लक्ष |
| 9 | फर्निचर | | 25 लक्ष |
| | एकुण | | 453 लक्ष |

उपरोक्त तक्त्याप्रमाणे रूपये 4.53 कोटी निधीची आवश्यकता प्रथम वर्षी लागण्याची शक्यता आहे. तसेच वर्गाच्या वाढीनुसार शिक्षकांच्या व इतर कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ होऊन,

तसेच दर वर्षी होणारी वेतन वृद्धी (अंदाजे 7%) पकडता हा खर्च दरवर्षी वाढत जाईल याबाबतचा संपूर्ण वर्ष निहाय तक्ता परिशिष्ट 'ब' मध्ये दर्शविलेला आहे.

**Single Division/Double Division** शाळा सुरू करावयाचे असल्यास यासाठी लागणारा शिक्षक/कर्मचारी वर्ग (**Staff**) व त्यावर लागणारा अपेक्षित खर्च खालीलप्रमाणे

**A)Single Division School Staffing Pattern from Jr. KG to Class 10**

| **Year** | **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** | **11** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Grades** | **JKG to SKG** | **JKG to 1** | **JKG to 2** | **JKG to 3** | **JKG to 4** | **JKG to 5** | **JKG to 6** | **JKG to 7** | **JKG to 8** | **JKG to9** | **JKG to 10** |
| **Kids** | **80** | **120** | **160** | **200** | **240** | **280** | **320** | **360** | **400** | **440** | **480** |
| School Leader | | | | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| Asst. School Leader | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| Teacher Leader | - | - | - | - | 1 | 1 | 1 | 2 | 2 | 2 | 2 |
| Pre-Primary Teacher | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 |
| Primary Teachers/ Subject Teacher | 0 | 2 | 2 | 4 | 4 | 5 | 9 | 9 | 9 | 12 | 12 |
| Hindi Marathi Teacher | 0 | 0.5 | 1 | 2 | 2 | 2 | 3 | 3 | 3 | 3.5 | 3.5 |
| Physical Education Teacher | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1.5 | 1.5 |
| Art Teacher | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| Computer Teacher | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.5 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| Counsellor | 0.5 | 0.5 | 0.5 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| Helper didi | 2 | 2 | 2 | 3 | 4 | 6 | 6 | 6 | 6 | 6 | 6 |
| School Administrator | 0.5 | 0.5 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| Social Worker | 0.5 | 0.5 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |

**B)Double Division School Staffing Pattern from Jr.KG to Class 10**

| **Year** | **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** | **11** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Grades** | **JKG-SKG** | **JKG-1** | **JKG-2** | **JKG-3** | **JKG-4** | **JKG-5** | **JKG-6** | **JKG-7** | **JKG-8** | **JKG -9** | **JKG-10** |
| **Kids** | **160** | **240** | **320** | **400** | **480** | **560** | **640** | **720** | **800** | **880** | **960** |
| School Leader | - | - | - | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| Asst. School Leader | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 2 | 2 | 2 |
| Teacher Leader | - | - | - | 1 | 2 | 2 | 3 | 3 | 3 | 3 | 3 |
| Pre-Primary Teacher | 8 | 8 | 8 | 8 | 8 | 8 | 8 | 8 | 8 | 8 | 8 |
| Primary Teachers/Subject Teacher | 0 | 2 | 4 | 7 | 8 | 10 | 17 | 17 | 17 | 24 | 24 |
| Hindi Marathi Teacher | 0 | 1 | 1 | 2 | 3 | 3 | 5 | 5 | 5 | 6.5 | 6.5 |
| Physical Education Teacher | 1 | 1 | 1 | 2 | 2 | 2 | 2 | 3 | 3 | 3 | 3 |
| Art Teacher | 1 | 1 | 1 | 2 | 2 | 2 | 2 | 3 | 3 | 3 | 3 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Computer Teacher | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.5 | 1 | 1 | 2 | 2 | 2 |
| Counsellor | 0.5 | 0.5 | 0.5 | 1 | 1 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 |
| Helper didi | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 9 | 10 | 10 | 10 | 10 |
| School Administrator | 0.5 | 0.5 | 1 | 1 | 1 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 |
| Social Worker | 0.5 | 0.5 | 1 | 1 | 1 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 |

**( C )Costing on Salary for running school in 1st year**

| For AY 25-26 | Single Division | Double Division | Unit Cost | Total Cost Single Division | Total Cost Double Division |
|---|---|---|---|---|---|
| **No. of children** | 80 | 160 | 0 | 0 | 0 |
| **No. of teachers** | 4 | 8 | 20270 | 81080 | 162160 |
| **No. of Admin** | 1 | 1 | 27447 | 27447 | 27447 |
| **No. of SW** | 1 | 1 | 28915 | 28915 | 28915 |
| **No. of Counselor** | 0.5 | 0.5 | 32840 | 16420 | 16420 |
| **No. of Art teachers** | 1 | 1 | 30405 | 30405 | 30405 |
| **No. of PT teachers** | 1 | 1 | 30405 | 30405 | 30405 |
| **No. of SL/ASL** | 1 | 1 | 61228 | 61228 | 61228 |
| **No. of helpers** | 4 | 6 | 19509 | 78036 | 117054 |
| **Total Yearly Cost** | | | | 4247232 | 5688408 |

तक्ता क्र.**A (Single Division school)** व **B(Double Division school)** मध्ये लागणारा शिक्षक/कर्मचारी यांची संख्यात्मक माहिती (**Staffing pattern**) इयत्ता **Junior KG** ते इयत्ता 10 वी पर्यंत दर्शविले आहे. तसेच तक्ता क्र. **C** मध्ये प्रथम वर्षी शिक्षक/कर्मचारी यांचे वेतनावर लागणारा खर्च दर्शविलेला आहे. याप्रमाणे **Single Division school** चालवावयाची असल्यास रु. 23,35,977/- इतका व **Double Division school** चालवावयाची असल्यास रु. 31,28,624/- इतका खर्च वेतनावर अनुमानित राहिल. प्रस्तुत खर्च अनुमानित असुन नेमण्यात येणा-या प्रत्यक्ष शिक्षक/कर्मचा-यांच्या संख्येप्रमाणे बदल संभवु शकेल. तसेच तक्ता क्र. **A** व **B** मध्ये दर्शविलेल्या तुकडी वाढीमुळे वर्ष निहाय शिक्षक/कर्मचारी संख्येप्रमाणे अपेक्षित रक्कमेत वाढ होईल.

महानगरपालिकेच्या शाळांच्या दर्जा वाढीकरिता स्वतंत्र प्रकल्प म्हणून यापुर्वीच हा प्रकल्प सुरू केलेला असुन या करिता अर्थसंकल्पात पद क्र.A25802041005 मध्ये दरवर्षी आवश्यक रकमेची स्वतंत्र तरतूद करण्यात येते. यामुळे खाजगी इंग्रजी शाळांच्या स्तरावरच महानगरपालिकेच्या इंग्रजी प्राथमिक शाळा खाजगी संस्थांच्या माध्यमातून चालविता येऊ शकत आहेत. यातील पायाभूत सुविधा जसे इमारत, इमारत रखरखाव / रंगरंगरेटी, दुरूस्ती, नविन बांधकाम, विद्युत व्यवस्था देयकासह, पाणीव्यवस्था देयकासह, विद्यार्थ्यांना गणवेश, पाठ्यपुस्तके, शालेय पोषण आहार, वाहतूक व्यवस्था याची जबाबदारी महानगरपालिकेकडे व शालेय प्रशासन व व्यवस्थापन शाळांमध्ये नियुक्त करावयाचे शिक्षक, शाळेचा दर्जा याची जबाबदारी खाजगी संस्था यांच्यावर राहील. प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देणे महानगरपालिकेच्या प्राथमिक कर्तव्यात मोडत असल्यामुळे प्राथमिक शाळा उघडण्याचा अधिकार महानगर पालिकेस आहे.या शाळा संपूर्ण इंग्रजी माध्यमाच्या असल्यामुळे व इंग्रजी शाळांना अनुदान न देण्याचे शासनाचे धोरण असल्याने प्राथमिक शाळांवर कार्यरत शिक्षकांच्या वेतनाचे 50 टक्के शासन अनुदान प्राप्त होणार नाही. या शाळांवरील सर्व खर्च महानगरपालिकेस वहन करावा लागेल. यामुळे खाजगी संस्थांच्या माध्यमातून शाळा संचालन करावयाचे असल्यास **Request for Proposal (REP)** प्रक्रीया करून या क्षेत्रात कार्यरत योग्य

संस्थेची निवड करणे संयुक्तीक राहील. निवड करीत असतांना ज्याप्रकारे शिक्षकांच्या वेतनाचा भार राज्य शासनाकडून उचलला जातो. त्याच धर्तीवर संस्था या शाळांचे संचालन करत असतांना शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा काही प्रमाणात भार उचलावा याबाबत **Request for Proposal (REP)** मध्ये कमर्शिअल प्रस्ताव मागणे योग्य राहील. प्रकल्प सूरवातीचा कालावधी २० वर्ष इतका राहील. परंतु म.न.पा.स कार्य समाधानकारक नाल्यास कालावधी कमी करण्याचा/ प्रकल्प बंद करण्याचा अधिकार राहील, प्रकल्प सूरवातीच्या प्रथम वर्षी **KG-१/KG-२** पासून शाळा सुरु करण्यात येईल. तद्नंतर नैसर्गिक वाढीनुसार इयत्ता १०वी पर्यंत वर्ग सुरु करुन चालविण्यात येतील.

सबब नागपूर महानगरपालिका क्षेत्रात स्वयंसेवी संस्था यांच्या मार्फत चालविण्यात येणा-या 6 (+ 2 चालु होण्याच्या प्रक्रियेत) इंग्रजी शाळांसोबतच शैक्षणिक सत्र 2026-27 मध्ये आणखी 7 इंग्रजी शाळा खाजगी स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने सुरू करण्याचे मान्यतेस्तव व संस्था निवडी करीता (RFP) Reqest For Proposal प्रक्रिया करण्यास्तव मान्यता देण्याचा विषय विचारात घेणे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :-** 42/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 04/09/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार सद्यःस्थितीत स्पर्धेच्या या युगात इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणे ही काळाची गरज बनलेली आहे. बदलत्या काळाची पावले ओळखून मध्यम वर्गीय किंवा आर्थिक कमकुवत गटातील पालकही आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत टाकत आहेत. याचा परिणाम म्हणून दिवसेंदिवस नागपूर महानगरपालिकेच्या मराठी/हिंदी/उर्दू प्राथमिक शाळांची पटसंख्या घसरत आहे. मागील 10 ते 15 वर्षाच्या काळात महानगरपालिकेच्या अंदाजे 100 शाळा बंद झालेल्या असून या पैकी 35 ते 40 शाळा इमारती रिकाम्या स्थितीत आहेत. मनपाच्या शाळांमध्ये शिक्षण घेणा-या पाल्यांचा आर्थिक स्तर दुर्बल/कमकुवत असल्यामुळे अश्या विद्यार्थ्यांना सुध्दा मध्यम/उच्च आर्थिक स्तर असलेल्या विद्यार्थ्यांप्रमाणे इंग्रजी माध्यमातुन शिक्षण घेण्याची संधी मिळावी व त्यांना हे शिक्षण मोफत मिळावे यास्तव शैक्षणिक सत्र 2020-21 पासुन 6 विधानसभा मतदार क्षेत्र निहाय प्रत्येकी 1 याप्रमाणे खालील 6 संपुर्ण इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरू करण्यात आल्या.

अ) पुर्व नागपूर — बाबुळबन मनपा इंग्रजी प्रा.शाळा
ब) पश्चिम नागपूर — रामनगर मनपा इंग्रजी प्रा.शाळा
क) मध्य नागपूर — स्व.गोपालरावजी मोटघरे मनपा इंग्रजी प्रा.शाळा
ड) उत्तर नागपूर — राणी दुर्गावती नगर मनपा इंग्रजी प्रा.शाळा
इ) दक्षिण नागपूर — म्हाळगीनगर मनपा इंग्रजी प्रा.शाळा
ई) दक्षिण पश्चिम नागपूर — स्व.बाबुरावजी बोबडे मनपा इंग्रजी प्रा.शाळा

प्रस्तावित —

अ) पश्चिम नागपूर - रा.ब.गो.गो.मनपा इंग्रजी प्रा.शाळा (शै.सत्र 2025-26 पासुन सुरू करण्यास मान्यता)

ब) उत्तर नागपूर – कुंदनलाल गुप्ता इंग्रजी प्रा.शाळा (शै.सत्र 2026-27 पासुन सुरू करण्यास मान्यता)

उपरोक्त सर्व शाळा या बंद किंवा अत्यंत कमी पटसंख्या असलेल्या होत्या.या सर्व ठिकाणी EOI प्रक्रिया राबवुन The Aakansha Foundation या स्वयंसेवी संस्थेची निवड करून शैक्षणिक सत्र 2021 – 22 मध्ये KG-1 व KG-2 हे वर्ग सुरू करण्यात आले. याबाबतचा सामंजस्य करार (MOU) दि. 12/06/2021 रोजी करण्यात आला.

पालकांची मनपा क्षेत्रात इतरही ठिकाणी या शाळा उघडण्याबाबत विनंती/मागणी मा. आयुक्त यांना प्राप्त झालेली असुन या शाळांमधील गुणवत्तापुर्ण शिक्षण बघता मा.आयुक्त यांनी देखिल महानगरपालिकेच्या ज्या शाळा इमारती बंद अवस्थेत/कमी पटसंख्या आहे, जेथे इयत्ता KG-1 ते 10 वी पर्यंत शाळा चालवायची असल्यास वर्गखोल्या उपलब्ध आहेत/बांधण्याची शक्यता आहे, क्रिडांगण उपलब्ध आहे व जेथे आसपास आर्थिक दुर्बल घटक/वंचित घटक वास्तव्यास असतील अश्या जागांचा शोध घेवुन येथे शाळा उघडणे शक्य आहे काय याबाबत अहवाल सादर करण्याचे निर्देशित करून स्वयंसेवी संस्थेच्या सहाय्याने नविन शाळा उघडण्याबाबत सभा घेण्यात आली. सद्यस्थितीत सुरू असलेल्या 6 शाळांकरीता राबविण्यात आलेल्या प्रक्रियेचाच व सर्व बाबींचा अवलंब करून आकांक्षा फाऊंडेशन सह/व्यतिरीक्त इतरही संस्था ज्या अशा प्रकारचे कार्य करीत असतील त्यांना आमंत्रित करन निविदा प्रक्रिया करावी. यास्तव खालील प्रमाणे नियोजित स्थळ प्रस्तावित करण्यात येत आहे.

**अ)शाळेचे ठिकाण/स्थळ**

1)उत्तर नागपूर – नारा मराठी प्रा.शाळा (महानगरपालिकेची बंद ईमारत असुन येथे नारा वस्ती, इंदोरा येथील विद्यार्थी प्राप्त होवु शकतील)

2)पुर्व नागपूर - बस्तरवारी मनपा माध्य.शाळा (मनपाची माध्यमिक शाळा असुन सद्यस्थितीत पटसंख्या 20 इतकी आहे. इंग्रजी शाळेकरीता दहीबाजार, बस्तरवारी, लालगंज, तांडापेठ, नाईक तलाव या परीसरातुन विद्यार्थी प्राप्त होवु शकतील.

3)मध्य नागपूर – महात्मा फुले मनपा हिंदी प्रा.शाळा (मनपाची बंद शाळा असुन रात्रीच्या सत्रात नाईट कॉलेज भरते. **G+1** इमारत असुन 14 वर्गखोल्या आहेत. कॉटन मार्केट परीसर, गंजीपेठ, गुजरवाडी या परीसरातुन विद्यार्थी प्राप्त होवु शकतील)

4) पश्चिम नागपूर – दाभा मनपा मराठी प्रा.शाळा (मनपाची शाळा असुन पटावर विद्यार्थी 12 आहेत प्रत्यक्षात नियमितपणे 4 विद्यार्थी हजर असतात. **G+**2 इमारत असुन 6 वर्गखोल्या आहे. तसेच बांधकामास जागा उपलब्ध आहे. दाभा, लावा, वाडी, हजारीपहाड, जागृती कॉलनी, सुरेंद्रगढ या परीसरातील विद्यार्थी प्राप्त होवु शकेल.

5)दक्षिण – पश्चिम नागपूर – अ) धंतोली मनपा प्रा.शाळा (मनपाची बंद शाळा ईमारत असुन जुनी इमारत आहे. सायंकाळच्या सत्रात रात्रशाळा चालते. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असुन तकीया, रामबाग, छोटी धंतोली, बर्डी या परीसरातील विद्यार्थी प्राप्त होवु शकतील.

ब) अजनी पुर्व समर्थ नगर मनपा शाळा, चुना भटटी नागपूर (मनपाची बंद शाळा असुन ही ईमारत जुनी आहे) ही शाळा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी स्थित असुन येथेचुना भटटी परीसरातील विद्यार्थी प्राप्त होवु शकतील.

6) दक्षिण नागपूर – यशवंतराव चव्हान मनपा शाळा (शाळेकरीता इमारत बांधण्यात आली परंतु प्रत्यक्षात शाळा सुरू झाली नाही. येथे खाजगी वाचनालय भरत असुन खालचा मजला पुर्णता रिकामा आहे. **G+1** इमारत असुन 9 वर्गखोल्या आहे. वरच्या माळयावर बांधकाम करता येवु शकेल. सोमवारी क्वॉटर्स, चंद्रमणी नगर, सक्करदरा, मेडीकल, हावरापेठ, बजरंग नगर, विश्वकर्मा नगर या परीसरातील विद्यार्थी प्राप्त होवु शकतील.

खालील प्रमाणे अनुमानित खर्च 7 शाळा सुरु याकरिता प्रथम वर्षी लागणार आहे.

| अ. क्र | विवरण | प्रति शाळा अपेक्षित वार्षिक खर्च | एकुण खर्च |
|---|---|---|---|
| 1 | पायाभूत सुविधा | 10 लक्ष | 70 लक्ष |
| 2 | शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवरील वेतन खर्च | | 3 कोटी |
| 3 | पाठयपुस्तके | | 4 लक्ष |
| 4 | गणवेश | | 4 लक्ष |
| 5 | पोषण आहार | 1 लक्ष | 7 लक्ष |
| 6 | परिवहन व्यवस्था | 2 लक्ष | 12 लक्ष |
| 7 | खेळणी व्यवस्था | 2 लक्ष | 14 लक्ष |
| 8 | डिजीटल वर्गखोली | 2.5 लक्ष | 17.5 लक्ष |
| 9 | फर्निचर | | 25 लक्ष |
| | एकुण | | 453 लक्ष |

उपरोक्त तक्त्याप्रमाणे रूपये 4.53 कोटी निधीची आवश्यकता प्रथम वर्षी लागण्याची शक्यता आहे. तसेच वर्गाच्या वाढीनुसार शिक्षकांच्या व इतर कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ होऊन, तसेच दर वर्षी होणारी वेतन वृद्धी (अंदाजे 7%) पकडता हा खर्च दरवर्षी वाढत जाईल याबाबतचा संपूर्ण वर्ष निहाय तक्ता परिशिष्ट 'ब' मध्ये दर्शविलेला आहे.

**Single Division/Double Division** शाळा सुरू करावयाचे असल्यास यासाठी लागणारा शिक्षक/कर्मचारी वर्ग (**Staff**) व त्यावर लागणारा अपेक्षित खर्च खालीलप्रमाणे

**A)Single Division School Staffing Pattern from Jr. KG to Class 10**

| **Year** | **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** | **11** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Grades** | **JKG to SKG** | **JKG to 1** | **JKG to 2** | **JKG to 3** | **JKG to 4** | **JKG to 5** | **JKG to 6** | **JKG to 7** | **JKG to 8** | **JKG to9** | **JKG to 10** |
| **Kids** | **80** | **120** | **160** | **200** | **240** | **280** | **320** | **360** | **400** | **440** | **480** |
| School Leader | | | | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| Asst. School Leader | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| Teacher Leader | - | - | - | - | 1 | 1 | 1 | 2 | 2 | 2 | 2 |
| Pre-Primary Teacher | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 |
| Primary Teachers/ Subject Teacher | 0 | 2 | 2 | 4 | 4 | 5 | 9 | 9 | 9 | 12 | 12 |
| Hindi Marathi Teacher | 0 | 0.5 | 1 | 2 | 2 | 2 | 3 | 3 | 3 | 3.5 | 3.5 |
| Physical Education Teacher | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1.5 | 1.5 |
| Art Teacher | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| Computer Teacher | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.5 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| Counsellor | 0.5 | 0.5 | 0.5 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| Helper didi | 2 | 2 | 2 | 3 | 4 | 6 | 6 | 6 | 6 | 6 | 6 |
| School Administrator | 0.5 | 0.5 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| Social Worker | 0.5 | 0.5 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |

**B)Double Division School Staffing Pattern from Jr.KG to Class 10**

| **Year** | **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** | **11** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Grades** | **JKG-SKG** | **JKG-1** | **JKG-2** | **JKG-3** | **JKG-4** | **JKG-5** | **JKG-6** | **JKG-7** | **JKG-8** | **JKG -9** | **JKG-10** |
| **Kids** | **160** | **240** | **320** | **400** | **480** | **560** | **640** | **720** | **800** | **880** | **960** |
| School Leader | - | - | - | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| Asst. School Leader | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 2 | 2 | 2 |
| Teacher Leader | - | - | - | 1 | 2 | 2 | 3 | 3 | 3 | 3 | 3 |
| Pre-Primary Teacher | 8 | 8 | 8 | 8 | 8 | 8 | 8 | 8 | 8 | 8 | 8 |
| Primary Teachers/Subject Teacher | 0 | 2 | 4 | 7 | 8 | 10 | 17 | 17 | 17 | 24 | 24 |
| Hindi Marathi Teacher | 0 | 1 | 1 | 2 | 3 | 3 | 5 | 5 | 5 | 6.5 | 6.5 |
| Physical Education Teacher | 1 | 1 | 1 | 2 | 2 | 2 | 2 | 3 | 3 | 3 | 3 |
| Art Teacher | 1 | 1 | 1 | 2 | 2 | 2 | 2 | 3 | 3 | 3 | 3 |
| Computer Teacher | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.5 | 1 | 1 | 2 | 2 | 2 |
| Counsellor | 0.5 | 0.5 | 0.5 | 1 | 1 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 |
| Helper didi | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 9 | 10 | 10 | 10 | 10 |
| School Administrator | 0.5 | 0.5 | 1 | 1 | 1 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 |
| Social Worker | 0.5 | 0.5 | 1 | 1 | 1 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 |

**( C )Costing on Salary for running school in 1st year**

| **For AY 25-26** | **Single Division** | **Double Division** | **Unit Cost** | **Total Cost Single Division** | **Total Cost Double Division** |
|---|---|---|---|---|---|
| **No. of children** | 80 | 160 | 0 | 0 | 0 |
| **No. of teachers** | 4 | 8 | 20270 | 81080 | 162160 |
| **No. of Admin** | 1 | 1 | 27447 | 27447 | 27447 |
| **No. of SW** | 1 | 1 | 28915 | 28915 | 28915 |
| **No. of Counselor** | 0.5 | 0.5 | 32840 | 16420 | 16420 |
| **No. of Art teachers** | 1 | 1 | 30405 | 30405 | 30405 |
| **No. of PT teachers** | 1 | 1 | 30405 | 30405 | 30405 |
| **No. of SL/ASL** | 1 | 1 | 61228 | 61228 | 61228 |
| **No. of helpers** | 4 | 6 | 19509 | 78036 | 117054 |
| **Total Yearly Cost** | | | | 4247232 | 5688408 |

तक्ता क्र.**A (Single Division school)** व **B(Double Division school)** मध्ये लागणारा शिक्षक/कर्मचारी यांची संख्यात्मक माहिती (**Staffing pattern**) इयत्ता **Junior KG** ते इयत्ता 10 वी पर्यंत दर्शविले आहे. तसेच तक्ता क्र. **C** मध्ये प्रथम वर्षी शिक्षक/कर्मचारी यांचे वेतनावर लागणारा खर्च दर्शविलेला आहे. याप्रमाणे **Single Division school** चालवावयाची असल्यास रु. 23,35,977/- इतका व **Double Division school** चालवावयाची असल्यास रु. 31,28,624/- इतका खर्च वेतनावर अनुमानित राहिल. प्रस्तुत खर्च अनुमानित असुन नेमण्यात

येणा-या प्रत्यक्ष शिक्षक/कर्मचा-यांच्या संख्येप्रमाणे बदल संभवु शकेल. तसेच तक्ता क्र. **A** व **B** मध्ये दर्शविलेल्या तुकडी वाढीमुळे वर्ष निहाय शिक्षक/कर्मचारी संख्येप्रमाणे अपेक्षित रक्कमेत वाढ होईल.

महानगरपालिकेच्या शाळांच्या दर्जा वाढीकरिता स्वतंत्र प्रकल्प म्हणून यापुर्वीच हा प्रकल्प सुरू केलेला असुन या करिता अर्थसंकल्पात पद क्र.A25802041005 मध्ये दरवर्षी आवश्यक रकमेची स्वतंत्र तरतूद करण्यात येते. यामुळे खाजगी इंग्रजी शाळांच्या स्तरावरच महानगरपालिकेच्या इंग्रजी प्राथमिक शाळा खाजगी संस्थांच्या माध्यमातून चालविता येऊ शकत आहेत. यातील पायाभूत सुविधा जसे इमारत, इमारत रखरखाव / रंगरंगरेटी, दुरूस्ती, नविन बांधकाम, विद्युत व्यवस्था देयकासह, पाणीव्यवस्था देयकासह, विद्यार्थ्यांना गणवेश, पाठ्यपुस्तके, शालेय पोषण आहार, वाहतूक व्यवस्था याची जबाबदारी महानगरपालिकेकडे व शालेय प्रशासन व व्यवस्थापन शाळांमध्ये नियुक्त करावयाचे शिक्षक, शाळेचा दर्जा याची जबाबदारी खाजगी संस्था यांच्यावर राहील. प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देणे महानगरपालिकेच्या प्राथमिक कर्तव्यात मोडत असल्यामुळे प्राथमिक शाळा उघडण्याचा अधिकार महानगर पालिकेस आहे.या शाळा संपूर्ण इंग्रजी माध्यमाच्या असल्यामुळे व इंग्रजी शाळांना अनुदान न देण्याचे शासनाचे धोरण असल्याने प्राथमिक शाळांवर कार्यरत शिक्षकांच्या वेतनाचे 50 टक्के शासन अनुदान प्राप्त होणार नाही. या शाळांवरील सर्व खर्च महानगरपालिकेस वहन करावा लागेल. यामुळे खाजगी संस्थांच्या माध्यमातून शाळा संचालन करावयाचे असल्यास **Request for Proposal (REP)** प्रक्रीया करून या क्षेत्रात कार्यरत योग्य संस्थेची निवड करणे संयुक्तीक राहील. निवड करीत असतांना ज्याप्रकारे शिक्षकांच्या वेतनाचा भार राज्य शासनाकडून उचलला जातो. त्याच धर्तीवर संस्था या शाळांचे संचालन करत असतांना शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा काही प्रमाणात भार उचलावा याबाबत **Request for Proposal (REP)** मध्ये कमर्शिअल प्रस्ताव मागणे योग्य राहील. प्रकल्प सूरवातीचा कालावधी २० वर्ष इतका राहील. परंतु म.न.पा.स कार्य समाधानकारक नाल्यास कालावधी कमी करण्याचा/ प्रकल्प बंद करण्याचा अधिकार राहील, प्रकल्प सूरवातीच्या प्रथम वर्षी **KG-१/KG-२** पासून शाळा सुरु करण्यात येईल. तद्नंतर नैसर्गिक वाढीनुसार इयत्ता १०वी पर्यंत वर्ग सुरु करुन चालविण्यात येतील.

सबब नागपूर महानगरपालिका क्षेत्रात स्वयंसेवी संस्था यांच्या मार्फत चालविण्यात येणा-या 6 (+ 2 चालु होण्याच्या प्रक्रियेत) इंग्रजी शाळांसोबतच शैक्षणिक सत्र 2026-27 मध्ये आणखी 7 इंग्रजी शाळा खाजगी स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने सुरू करण्याचे मान्यतेस्तव व संस्था निवडी करीता (RFP) Reqest For Proposal प्रक्रिया करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.